# कृषि विज्ञान केंद्र , यवतमाळ
# लम्पी स्किन डिसीज

**(जनावरातील एक नवीन साथीचा रोग)**


गोपालक शेतकरी बांधवांनो आपल्या गाई , म्हशी साठी एक नवीन साथीच्या रोगाची धोक्याची घंटा ही आपल्यापर्यंत पोचली आहे कारण महाराष्ट्र आणि जवळपास सर्वच राज्यांमध्ये लम्पी स्कीन डिसीज या रोगाचा प्रादुर्भाव अत्यंत झपाट्याने वाढलेला मागील काही महिन्यांमध्ये दिसून आलेला आहे त्यामुळे आपण व आपलं गोधन कसे सुरक्षित राहील याचा विचार प्रथम केला पाहिजे चला तर मग या रोगाविषयी आपण थोडक्यात माहिती घेऊया.

लम्पी हा रोग इसवी सन 1929 पासून 1978 पर्यंत मुख्यत्वे आफ्रिकेत आढळत होता नंतर हरवा हळुवारपणे या रोगाने सभोवतालच्या इतर देशांमध्ये शिरकाव केला मात्र सन 2013 नंतर या रोगाचा वेगाने आणि झपाट्याने सर्व दूर प्रसार होऊ लागला आहे हा रोग अनेक युरोपीय व आशियाई देशांमध्ये पसरताना दिसत आहे भारतात सदर रोगाची पहिली नोंद ऑगस्ट २०१९ मध्ये ओरिसा राज्यात झाली तर नंतर झारखंड पश्चिम बंगाल छत्तीसगड तेलंगाना आंध्र प्रदेश कर्नाटक व केरळ या राज्यात या आजाराचा शिरका झालेला आढळून आला आहे तसेच महाराष्ट्रात या आजाराचा प्रसार गडचिरोली जिल्ह्यातील सिरंच्या तालुक्यांमध्ये मार्च 2020 या महिन्यापासून सुरुवात झालेली दिसून आलेली आहे तसेच सात रोगाचे प्रतीनिदान भोपाळ येथील राष्ट्रीय रोगनिदान प्रयोगशाळेत झालेले आहे त्यामुळे आपल्याला या रोगाबद्दल माहिती घेणे व या रोगाचा प्रसार कसा टाळता येईल निरोगी जनावरांना आपल्याला कसे वाचवता येतील हे प्रयास गोपालकांकडून होणे अपेक्षित आहे.

हा रोग कप्रिपोक्ष या संवर्गातील असून हा रोग गायी व म्हशी न मध्ये मुख्यत्वे आढळतो परंतु शेळ्या आणि मेंढ्यांमध्ये हा रोग अजिबात होत नाही विदेशी वंशाच्या म्हणजेच पाठीवर व व व वशिंड नसलेल्या जसे जर्सी होलसेल आणि संकरित गाईंमध्ये देशी वंशाच्या गाईपेक्षा या रोगाचे प्रमाण अधिक असते सर्व वयोगटातील नर आणि मादी हा रोग आढळून येतो परंतु मात्र लहान वासरात प्रौढ जनावरांच्या तुलनेत या रोगाचे प्रमाण अधिक आहे

उष्ण व दमट हवामान रोगप्रसार होण्यास अधिक पोषक असते म्हणजे अशा वातावरणामध्ये कीटकांची वाढ जास्त प्रमाणात होते तसेच उन्हाळ्यात अधिक प्रमाणात हा रोग आढळतो मात्र हिवाळ्यात या रोगाचे प्रमाण थोडे कमी होते आजाराचा रोग दर 2.45% तर मृत्यू दर एक ते पाच टक्के पर्यंत आढळून येतो या आजारामध्ये होणाऱ्या मरतुकीचे प्रमाण कमी असले तरी रोगी जनावरे अशक्त होतात त्यांचे दुग्धोत्पादन मोठ्या प्रमाणावर घटते तसेच जनावरांमध्ये काही वेळा गर्भपात झालेला आढळून येतो अशा जनावरांमध्ये त्यांची प्रजनन क्षमता कायमची घट झाल्याचे आढळून आलेले आहे यामुळे पशुपालकाचे फार मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान होते या जनावरांमध्ये त्यांच्या त्वचेवर मोठ मोठाले उभारतात व त्यामुळे त्वचा खराब झाल्यामुळे जनावरे विकृत दिसतात

**रोगप्रसार**




या आजाराचा प्रसार प्रमुख्या ने चावणारे माशा स्ट्रोमॉक्सिस एडीस गोचीड चिलटे क्युली कॉएड्स यांच्यामार्फत होतो तसेच या आजाराच्या विषाणूचा संसर्ग निरोगी व बाधित जनावरे यांच्यातील प्रत्यक्ष स्पर्शाने होऊ शकतो विषाणू संक्रमण झाल्यानंतर एक ते दोन आठवड्यापर्यंत रक्तामध्ये राहतात व नंतर शरीराच्या इतर भागात संक्रमित होतात त्यामुळे रक्तातील स्त्राव डोळ्यातील पाणी व तोंडातील लायेतून विषाणू बाहेर पडून चारा व पाणी दूषित होतो व त्यातून इतर जनावरांना या विषयाचा रोगप्रसार होऊ शकतो त्वचेवरील खपल्या गळून पडल्यानंतर त्यामध्ये विषाणू दीर्घकाळ जवळपास 35 दिवसापर्यंत जिवंत राहू शकतात तसेच विर्यात विषाणू येत असल्याने रोगाचा फायदा कृत्रिम किंवा नैसर्गिक रेतनातून सुद्धा होऊ शकतो गाभण जाणारे ते आजाराची लागण झाल्यास गर्भपात किंवा रोगग्रस्त वासरांचा जन्म होतो दूध पिणाऱ्या वासरांना आजारी गाईच्या दुधातून व स्तनातील व्रणातून रोगाचा प्रसार होऊ शकतो त्यामुळे शेतकऱ्यांनी व गोपालकांनी तसेच दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांनी या रोगाची काळजी घेणे आवश्यक आहे.

**लक्षणे**

बाधित जनावरांमध्ये आजाराचा सुप्त काळ साधारणपणे दोन ते पाच आठवडे एवढा असतो या आजाराच्या प्रथम जनावरांच्या डोळ्यातून व नाकातून पाणी येते लसिका ग्रंथींना सूज येते सुरुवातीस भरपूर ताप होतो दुग्ध जनावराच्या उत्पादनात दूध उत्पादनात कमी होते चारा खाणे पाणी पिणे कमी होते तसेच त्वचेवर हळूहळू दहा ते पन्नास मिलिमीटर व्यासाच्या गाठी प्रामुख्याने डोके मान पाय मायनस इत्यादी भागात येतात

काही वेळा तोंड नाक व डोळयात आवरण निर्माण होतात तोंडातील प्राण्यामुळे आजारी जनावरांच्या चारा चढण्यास त्रास होतो. डोळ्यातील वऱ्हाणामुळे चिपळी येते तसेच डोळ्याची दृष्टी बाधित होते या आजाराच्या प्रादुर्भावामुळे फुफ्फुसता किंवा स्तन दहा हजाराचे पाहता पशुंमध्ये मध्ये होऊ शकते

रक्तातील पांढऱ्या पेशी व प्लेटलेट ची संख्या कमी होते व पायावर सूज येऊन काही जनावरे लंगडतात ही या आजाराची प्रमुख लक्षणे आहेत

**रोग नियंत्रण कसे करावे**

- बाधित जनावरांची तपासणी करणाऱ्या पशुवैद्यकीय डॉक्टरांनी योग्य पोशाख परिधान करावा हातात डेटॉल किंवा अल्कोहोल मिश्रित सॅनिटायझरने हात स्वच्छ धुऊन घ्यावे
- तपासणी झाल्यानंतर कपडे व फुटवेअर गरम पाण्यात दोन निर्जंतुक करावेत अशा जनावरांच्या संपर्कात आलेले साहित्य जसे वाहन परिसर इत्यादी निर्जंतू करून घेण्यात यावी गोठा व परिसर स्वच्छ हवे चीर ठेवावा परिसरात पाणी साठणार नाही याची दक्षता घ्यावी कीटकनाशक औषधीचा जनावराच्या अंगावर व गोठ्यात फवारा मारावा आजारी जनावरांच्या संपर्कातील जनावरांना इंजेक्शन दिल्यास कीटक नियंत्रण होऊन रोगप्रसाद काही प्रमाणात आळा बसल्याचे दिसून आले आहे
- सध्या भारतात या रोगाची लस उपलब्ध नाही मात्र शेळयात देवीवर वापरणारे येणारी लस वापरून हा रोग नियंत्रणात आणता येऊ शकतो या जंतूचा मानवात सहसा प्रादुर्भाव होत नाही परंतु शेतकऱ्यांनी जनावराने हाताळल्यानंतर हाच साबणाच्या पाण्याने स्वच्छ धुऊन घ्यावी किंवा सॅनिटायझरने साफ करून घ्यावेत
- शास्त्रीय दृष्ट्या या साथीच्या काळात किंवा नेहमी सर्वांनी दूध उकळून प्यावे किंवा मास शिजवूनच खावे
- प्रादुर्भावग्रस्त भागात जनावरांची ज्ञान व वाहतूक करण्यास बंदी आणली तसेच जनावरांचे बाजार हे बंद ठेवण्यात यावी
- रोगग्रस्त जनावराचा मृत्यू झाल्यास मृतदेह किमान आठ फूट खोल खड्ड्यात पुरावा असे केल्यास निरोगी जनावरास या रोगाचा प्रादुर्भाव होणार नाही व या आजारास आळा बसण्यास मदत होईल.
- तसेच सध्याची परिस्थिती पाहता सर्व शेतकऱ्यांना विनंती आहे की शेतकऱ्यांनी घाबरून न जाता योग्य वेळी पशुवैद्यकीय डॉक्टरांची मदत घेऊन या रोगांवर ताबडतोब औषध उपचार करावा व डॉक्टरच्या देखरेखीखाली जनावरांची तब्येत सुधारेपर्यंत ठेवावा.



आजारी जनावर आणि लक्षणे

लेखक :-

डॉ.गणेश यु .काळुसे,
विषय विशेषज्ञ (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय)
डॉ .प्रमोद . ना . मगर
विषय विशेषज्ञ (कीटकशास्त्र )
डॉ. सुरेश यु. नेमाडे
(शास्त्रज्ञ तथा प्रमुख )
कृषि विज्ञान केंद्र , यवतमाळ